# चक्रीवादळामुळे परीक्षा पुढे ढकलली

## १७, १९ व २० तारखेचेच पेपर नंतर होणार



**कोल्हापूर, ता. १५ :** चक्रीवादळामुळे शिवाजी विद्यापीठाच्या अंतिम वर्षाची परीक्षा पुढे ढकलण्यात आल्या आहेत. शनिवारी (ता. १७), सोमवारी (ता. १९) आणि मंगळवारी (ता. २०) होणारे सर्व अभ्यासक्रमांचे पेपर पुढे ढकलण्यात आले आहेत. बुधवारी (ता. २१) आणि त्यानंतर सर्व पेपर हे ठरलेल्या नियोजनाप्रमाणेच होतील, अशी माहिती विद्यापीठाच्या परीक्षा विभागाकडून देण्यात आली. याबाबतचे परिपत्रक जाहीर करण्यात आले आहे.

परिपत्रकातील माहितीनुसार, वेधशाळेने पुढील काही दिवस चक्रीवादळाची शक्यता वर्तवली आहे. त्याचा परिणाम शिवाजी विद्यापीठाच्या परीक्षांवरही झाला आहे. १७ ऑक्टोबरपासून अंतिम वर्षाच्या परीक्षा सुरू होणार होत्या. मात्र चक्रीवादळामुळे १७, १९ आणि २० ऑक्टोबरला होणारे पेपर पुढे ढकलले आहेत. त्या त्या अभ्यासक्रमाची परीक्षा ज्या दिवशी संपते त्याच्या पुढे तीन दिवस सलग हे पेपर होणार आहेत. २१ ऑक्टोबर आणि त्यानंतर होणारे सर्व पेपर ठरलेल्या नियोजनाप्रमाणेच होतील.

### सराव परीक्षा सुरू

आजपासून विद्यापीठाच्या सराव परीक्षांना सुरवात झाली. विद्यार्थ्यांना त्यांच्या मेल आयडी आणि एस.एम.एस वर लिंक शेअर करण्यात आली. त्यात असणारी प्रश्नपत्रिका विद्यार्थ्यांनी सोडवली. ५० हजार विद्यार्थ्यांना लिंक पाठवली होती. त्यातील काही विद्यार्थ्यांनी सराव परीक्षा दिली. ही सराव परीक्षा दिली असून, पुढील १० दिवस ती सुरू राहणार आहे.

# शिवाजी विद्यापीठाच्या अंतिम वर्षाच्या लेखी परीक्षा बुधवारपासून

लोकमत न्यूज नेटवर्क

कोल्हापूर : विविध विद्याशाखेच्या अंतिम सत्र, वर्षातील लेखी परीक्षा शनिवार (दि. १७) पासून ऑनलाईन आणि ऑफलाईन पध्दतीने घेण्याचे नियोजन शिवाजी विद्यापीठाने केले होते. मात्र, राज्यातील अतिवृष्टीमुळे चक्रीवादळाची शक्यता असल्याने या नैसर्गिक आपत्तीचा विचार करुन विद्यापीठाने शनिवार, सोमवार आणि मंगळवारच्या परीक्षा पुढे ढकलण्याचा निर्णय गुरुवारी घेतला आहे. त्यामुळे या लेखी परीक्षांचा प्रारंभ आता दि. २१ ऑक्टोबरपासून होणार आहे. विद्यापीठाने अंतिम सत्र, वर्षाच्या परीक्षा दि. १० ऑक्टोबरपासून घेण्याचे नियोजन केले होते. मात्र, सप्टेंबरच्या अखेरच्या आठवड्यात विविध मागण्यांसाठी विद्यापीठ सेवकांचे लेखणीबंद आंदोलन केल्याने या परीक्षेची तयारी ठप्प झाली. आता बुधवारपासून परीक्षा घेण्याचा निर्णय घेतला आहे.

# जाणिवा प्रगल्भतेसाठी वाचन संस्कृतीचा विकास महत्त्वाचा

## डॉ. राजन गवस; विद्यापीठात वाचन प्रेरणा दिन

**कोल्हापूर : पुढारी वृत्तसेवा**

माणूस म्हणून स्वत:च्या जाणिवा सजग व प्रगल्भ होण्यासाठी वाचन संस्कृतीचा विकास महत्त्वाचा आहे, असे प्रतिपादन ज्येष्ठ साहित्यिक डॉ. राजन गवस यांनी केले.

शिवाजी विद्यापीठाच्या मराठी अधिविभागातर्फे आयोजित वाचन प्रेरणा दिनाच्या निमित्ताने 'मराठी वाचन संस्कृती' या विषयावर ई-चर्चेमध्ये बीजभाषक म्हणून ते बोलत होते. उद्घाटक म्हणून कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के चर्चेत सहभागी झाले. डॉ. गवस म्हणाले, विविध शैक्षणिक धोरणांमध्ये यशवंतराव चव्हाण यांचा अपवाद वगळता वाचनाला केंद्रस्थानी फारसे कोणी आणण्याचा प्रयत्न केला नाही. प्रकट वाचन आणि मनन यापलीकडे आपण विद्यार्थ्यांना वाचनासाठी प्रोत्साहित करीत नाही. ग्रंथवाचनाच्या पलीकडे भोवतालाचे वाचन करायला शिकणे, शिकविणे आवश्यक आहे.

उद्घाटनपर भाषणात कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के म्हणाले, सजग, सकारात्मक वाचनाभिरुची विकसित होण्यासाठी समाजाशी नाळ जोडणारे वाचन आणि लेखन यांच्याशी नवी पिढी जोडली जाणे, समाजाच्या तळागाळातील घटकांच्या समस्यांशी, त्यांच्या वेदनांशी तिचे नाते जोडले जाणे महत्त्वाचे आहे. समाजाच्या वेदनांशी जोडणारे साहित्य आणि वाचन यांची आजच्या पिढीमध्ये रुजवात व जोपासना होण्याची गरज आहे. त्या दृष्टीने डॉ. ए. पी. जे. अब्दुल कलाम यांनी हयातभर प्रयत्न केले.

प्रा. नितीन रिंढे म्हणाले, वाचन विविध विषयांना स्पर्श करणारे हवे. साजरीकरणाच्या पलीकडे वाचनाकडे कसे पाहतो, वाचन कसे करतो, याकडे लक्ष देणे ही आज खरी गरज आहे. साहित्यिक गणेश विसपुते म्हणाले, शंभर वर्षांच्या कालखंडाचा वेध घेत असताना मराठी वाचन आणि वाचक टप्प्याटप्प्यांने प्रगल्भ होत गेल्याचे दिसते. मराठी अधिविभाग प्रमुख डॉ. रणधीर शिंदे यांनी प्रास्ताविक केले. डॉ. नंदकुमार मोरे यांनी आभार मानले. गुगल मिट, फेसबुक लाईव्हद्वारे झालेल्या कार्यक्रमात सुमारे ११०० प्रेक्षक सहभागी झाले होते.

# विकासासाठी कुलगुरूंना पूर्ण सहकार्य

## विद्यापीठ विकास आघाडी : डी. टी. शिर्के यांचा सत्कार

लोकमत न्यूज नेटवर्क

**कोल्हापूर :** शिवाजी विद्यापीठाच्या विकासाच्या अनुषंगाने सर्व बाबतींत कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के यांना पूर्ण सहकार्य केले जाईल, अशी ग्वाही विद्यापीठ विकास आघाडीच्या वतीने मंगळवारी (दि. १३) देण्यात आली.

विकास आघाडीच्या वतीने प्राचार्य क्रांतिकुमार पाटील आणि विद्यापीठ प्राचार्य संघटनेच्या वतीने डॉ. डी. आर. मोरे यांनी कुलगुरू डॉ. शिर्के यांचा सत्कार करण्यात आला. विद्यापीठाच्या सर्व विभागांची डॉ. शिर्के यांना माहिती आहे. त्यांच्या रूपाने विद्यापीठाला कार्यकुशल प्रशासक मिळाले आहेत. त्यांना सर्व बाबतींत सहकार्य केले जाईल, असे विकास आघाडीच्या वतीने प्राचार्य पाटील यांनी सांगितले. यावेळी भैय्या (प्रताप) माने यांनी सांगितले. यावेळी आमदार राजूबाबा आवळे, प्रा. डी. यू. पवार, डॉ. जे. एफ. पाटील, जयंत आसगांवकर, डॉ. प्रताप पाटील, चित्रलेखा कदम, प्रा. मोहन राजमाने, डी. जी. कणसे, संजय जाधव, मधुकर पाटील, सागर डेळेकर, भाग्यश्री जाधव, विनोद पंडित उपस्थित होते. एल. जी. जाधव यांनी स्वागत केले. व्ही. एम. पाटील यांनी आभार मानले.



शिवाजी विद्यापीठ विकास आघाडी आणि प्राचार्य संघटनेच्या वतीने डॉ. क्रांतिकुमार पाटील यांनी कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के यांचा केला. यावेळी डावीकडून डी. यू. पवार, जे. एफ. पाटील, प्रताप पाटील, डी. आर. मोरे, भैय्या माने, जयंत आसगांवकर, चित्रलेखा कदम, आदी उपस्थित होते.

### नावलौकिकासाठी कार्यरत

सर्व घटकांना सोबत घेऊन विद्यापीठाला देशातील एक सर्वोत्तम विद्यापीठ म्हणून नावलौकिक मिळावा यासाठी कार्यरत राहीन, अशी ग्वाही डॉ. शिर्के यांनी दिली.

# विद्यापीठप्रश्नी उद्या बैठक

लोकमत न्यूज नेटवर्क

**कोल्हापूर :** शिवाजी विद्यापीठाचा सुवर्णमहोत्सवी निधी, वेतननिश्चिती, तंत्रज्ञान अधिविभागाची मान्यता, आदी विविध २५ प्रश्नांबाबत उच्च व तंत्रशिक्षणमंत्री उदय सामंत यांनी मुंबईत गुरुवारी नियोजित केलेली बैठक तांत्रिक कारणामुळे झाली नाही. ही बैठक शनिवारी (दि. १७) होणार आहे.

अंतिम वर्षाच्या परीक्षांची तयारी आणि सीमाभागातील विद्यार्थ्यांसाठी उभारण्यात येणाऱ्या शैक्षणिक संकुलाबाबतच्या विद्यापीठाकडून झालेल्या कार्यवाहीचा आढावा घेण्यासाठी ८ ऑक्टोबर रोजी मंत्री सामंत यांनी विद्यापीठात आढावा बैठक घेतली होती. त्यावेळी त्यांनी विद्यापीठाच्या प्रलंबित प्रश्नांबाबत चर्चा करण्यासाठी गुरुवारी मुंबईत बैठक घेण्यात येणार असल्याचे सांगितले होते. त्यासाठी त्यांना आवश्यक माहिती विद्यापीठाने दोन दिवसांपूर्वी सादर केली आहे.